EMS आकस्मिक वैद्यकीय सेवा (१०८ सह) कार्यक्रम व ARSH/ राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम जनजागृती उपक्रम कृती नियोजन - सन २०१७-१८ अंतर्गत प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१८/प्र.क्र.५७ /आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - मावज २०१६/प्र.क्र.३९७/३४, दि.०५.०१.२०१७

२) आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/खरेदी/कक्ष /टे-५/४०९९/ प्रशासकीय मंजुरी/२०१८,दिनांक २६.०३.२०१८.

शासन निर्णय:

EMS आकस्मिक वैद्यकीय सेवा (१०८ सह) कार्यक्रम व जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत खालील जनजागृती व प्रसिध्दी उपक्रमास आणि त्यासाठी आवश्यक अनुदान खर्च करण्यास याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	उपक्रम	तपशिल	अपेक्षित खर्च (लाख/रुपये)
१	वृत्तपत्र जाहिरात	राज्यातील सर्व जिल्हयात पोहचणा-या अ व ब गटातील प्रमुख मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दु भाषेतील वृत्तपत्रांमध्ये रंगीत, सचित्र क्वार्टर पेज जाहिरात D.G.P.I.R.च्या शासन मान्य दराने एकदाच प्रसिध्दीस देणे .	२०.००

		याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	
२	दुरदर्शन वरुन ६० सेकंदाचा टी.व्ही.स्पॉट प्रसारीत करणे	सायंकाळी ७.०० च्या बातम्यांपुर्वी व रात्री ९.३० च्या बातम्यांमध्ये निधीनुसार D.G.P.I.R.च्या शासन मान्य दराने प्रसारण करणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	७३.००
३	लोकराज्य मासिकामध्ये जाहिरात देणे	EMS आकस्मिक वैद्यकीय सेवा (१०८ सह) बाबत लोकराज्य मासिकामध्ये जाहिरात छपाई करणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	२.००
४	दुरदर्शनवरुन स्क्रोल संदेश प्रसारीत करणे	दुरदर्शनवरुन दररोज एकदा संध्याकाळी ६ ते ७ या कालावधीमध्ये बसतील तेवढे स्क्रोल संदेश (१८० शब्दात) प्रसारीत करणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	५.००
		एकूण	**१००.००**

२. वर नमूद उपक्रमांसाठीचा खर्च सन २०१७-१८ च्या पीआयपी मध्ये मंजूर केलेल्या EMS आकस्मिक वैद्यकीय सेवा (१०८ सह) कार्यक्रमांतर्गत (B.१०.७.४.३०) साठी रु.१००.०० लाख मंजूर असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

३. याशिवाय ARSH/ राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम व जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत खालील जनजागृती व प्रसिध्दी उपक्रमास आणि त्यासाठी आवश्यक अनुदान खर्च करण्यास याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	उपक्रम	तपशिल	अपेक्षित खर्च (लाख/रुपये)
१	दुरदर्शन, खाजगी मराठी न्युज व मनोरंजन वाहिन्यांवरुन AFHS/PMHS/WIFS विषयी संदेशाचे टी.व्ही. टि.व्ही.स्पॉट प्रसारीत करणे	AFHS (३० व ६० सेकंदाचे प्रत्येकी तीन)/ PMHS (३० सेकंदाचे दोन व ६० सेकंदाचे तीन) व WIFS (३० सेकंदाचे दोन) या विषयाचे टी.व्ही.स्पॉट आवश्यकतेनुसार आलटून पालटून मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे दिवस प्रसारण करणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	६५.२१
२	AFHS/PMHS/WIFS विषयी संदेशाचे जिंगल प्रसारीत करणे	AFHS (४० व ६० सेकंदाचे प्रत्येकी तीन)/ PMHS (३० व ६० सेकंदाचे प्रत्येकी दोन) व WIFS (४५ सेकंदाचे दोन) या विषयाचे जिंगल्स आवश्यकतेनुसार आलटून पालटून मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे दिवस प्रसारण करणे. अ) मंजूर निधीपैकी रु.१०.३९ लाख निधीमधून आकाशवाणी केंद्रावरुन दररोज सकाळी एकदा ७.१० च्या बातम्यांपुर्वी बसतील तेवढी प्रसारणे करणे. ३) ब) रु.१०.०० लाख निधीमधून खाजगी एफ.एम.चॅनल्सवरुन जिंगल्स प्रसारण करणे क) उर्वरीत रु.४०.०० लाख निधीमधून AFHS कार्यक्रम सुरु असणा-या १० जिल्हयातील प्रमुख एस.टी.स्टँडवर संगणक प्रणालीव्दारे जिंगल्स प्रसारण करणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	६०.३९
३	केंद्र शासनाकडून प्राप्त AFHS/PMHS/WIFS विषयी संदेशाचे हिंदी टी.व्ही. टि.व्ही.स्पॉटचे मराठी भाषेत रुपांतर व दुरुस्ती करणे.	AFHS (३० व ६० सेकंदाचे प्रत्येकी तीन)/ PMHS (३० सेकंदाचे दोन व ६० सेकंदाचे तीन) व WIFS (३० सेकंदाचे दोन) या विषयाचे हिंदी टी.व्ही.स्पॉटचे मराठी भाषेत रुपांत करणे लोगो, सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन इ.वाक्यांचा समावेश करुन डीव्हीप्रो/बीटा व मास्टर	६.००

		सीडी इ.तयार करून घेणे. मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे टि.व्ही.स्पॉटचे डबिंग करुन घेणे. याबाबत महासंचालक, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.	
४	AFHS/PMHS/WIFS विषयी संदेशाची प्लेक्सबोर्ड पोस्टर्स तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे.	केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विविध नमुन्याप्रमाणे विविध आकाराची रंगीत (४ रंगाची) सचित्र प्लेक्सबोर्ड पोस्टर्स तयार करणे. सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडून पोस्टर्सची छपाई करून घेण्यात येईल.	३६.८०
५	AFHS/PMHS/WIFS विषयी संदेशाची पोस्टर्स तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे.	**आकार** - १४ इंच x १९ इंच **कागद**- ९० जीएसएम पोस्टर्स सचित्र, रंगीत छपाई, पाठीमागील बाजूस वर व खाली गमींग अथवा अडकविण्याची सुविधा, पुढील बाजूस लॅमिनेशन असलेले. **एकूण पोस्टर्सची संख्या**- सर्व खर्चासहित मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडून पोस्टर्सची छपाई करून घेण्यात येईल.	२०.२५
६	ARHS कार्यक्रमांतर्गत प्रश्न मनाचे (पॉकेट बुक) तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे	**आकार** - ५.५ इंच x ४ इंच **कागद**- आर्ट पेपर, आतील कागद ८० जीएसएम, एकूण पाने १२, चार रंगात, पाठोपाठ छपाई, फोल्डींग/क्रिझेंग/पॅकींगसह उपलब्ध अनुदानातून बसतील तेवढे प्रश्न मनाचे पुस्तिका मनाचे (पॉकेट बुक) तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे . सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडून पोस्टर्सची छपाई करून घेण्यात येईल.	७०.००
७	ARHS कार्यक्रमांतर्गत लिफलेट तयार करुन जिल्हयांना पुरवठा	**आकार** - ४ ए **कागद**- १३० जी.एस.एम. सचित्र, रंगीत पुढील बाजूस लॅमिनेशन, मागील	७९.६५

	करणे.	पांढरी बाजू कोरी आलेले लिफलेट सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडून पोस्टर्सची छपाई करून घेण्यात येईल.	
८	PMHS कार्यक्रमांतर्गत बुकलेट तयार करुन जिल्हयांना पुरवठा करणे.	१६ पानी बुकलेट, केंद्र शासनाने दिलेल्या नमुन्याप्रमाणे निधीमध्ये बसतील तेवढे तयार करुन घेण्यात येईल. सदर काम शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडून पोस्टर्सची छपाई करून घेण्यात येईल	१६.००
			११८.६५

४. वर नमूद उपक्रमांसाठीचा खर्च सन २०१७-१८ च्या पीआयपी मध्ये मंजूर केलेल्या ARSH/ राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रमांतर्गत (B.१०.३.४) साठी रु.४२२.३० लाख मंजूर असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

५. शासकीय जाहिरात वितरण धोरणासंदर्भात संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयातील आदेशानुसार सदर उपक्रमास महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३० /२०१३ /विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११४०००७१८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.31 21:36:59 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
५. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)आरोग्य सेवा, मुंबई.
६. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).